रामानंद नगर,.पो.स्टे.जळगाव

दुरध्वनी क्रमांक 0257-2210500

दिनांक 13/09/2025

==========================================================

**प्रेसनोट**

विषय :- रामानंद पोलीसांची धडक कारवाई – गावठी कट्टयासह सराईत ताब्यात.

मा. पोलीस अधिक्षक श्री महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री अशोक नखाते, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री नितीन गणापुरे यांनी पोस्टे रेकॉर्डवरील गुन्हेगांरावर बारकाईने नजर ठेवुन त्यांचेवर धाक निर्माण करुन कायदा व सुव्यवस्था निर्माण होणार नाही याबाबत सुचना दिलेल्या होत्या.


त्यानुसार आज दिनांक 13/09/2025 रोजी पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ रामानंद नगर पोलीस स्टेशन यांना गोपणीय बातमी मिळाली होती की, पिंप्राळा परीसरातील सराईत गुन्हेगार महेंद्र उर्फ दादु समाधान सपकाळे हा पिंप्राळा हुडको परीसरात हातात गावठी कट्टा घेवुन दहशत माजवित आहे व सदर परीसरातील लोक हे भयभीत झाले असुन ते त्यांचे रस्त्यावरील दुकाने बंद करीत आहे अशा बातमीवरुन गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांना महेद्र उर्फ दादु सपकाळे यास ताब्यात घेवुन कारवाई करणेबाबत आदेश दिले.

त्यानुसार गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार असे पिंप्राळा हुडको परीसरात महेंद्र उर्फ दादु सपकाळे याचा शोध घेत असतांना तो पिंप्राळा रोड कडे जाणा-या रोड ने पळुन जात असल्याची माहीती नागरीकांनी दिली. सदरचे पथक हे त्याचा शोध घेत असतांना तो खंडेराव नगर कडे जाणा-या रोडने पळत जात असतांना दिसुन आल्याने त्यास पथकाच्या मदतीने शिताफिने ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन 20,000/- रुपये किंमतीचा गावठी बनावटीचा कट्टा(अग्नीशस्त्र) व एक जिवंत काडतुस जप्त करण्यात आले आहे. सदर सराईतावर रामानंद नगर पोस्टे ला एकुण 05 गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही . पोलीस अधिक्षक श्री महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री अशोक नखाते, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री नितीन गणापुरे, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र गुंजाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सचीन रणशेवरे, पोहेका जितेंद्र राजपुत, सुधाकर अंभोरे, जितेंद्र राठोड, सुशील चौधरी, पोना हेमंत कळसकर, मनोज सुरवाडे, रेवानंद साळुंखे, योगेश बारी, विनोद सुर्यवंशी, गोविंदा पाटील यांनी केली आहे.

**गुन्ह्याचा पुढील तपास – पोउपनि सचीन रणशेवरे हे करीत आहेत.**

**पोलीस निरीक्षक**
**रामानंद नगर पो.स्टे.जळगांव**


रामानंद नगर पोलीस स्टेशन,
जळगांव गुरनं. 324/2025
आर्म अ‍ॅक्ट 3/25 प्रमाणे.